**<u>निशाणी ०५ लगत आदेश</u>**

**( प्रकाश गावडे व.२ वि.दिनकर गावडे व.७)**

**<u>सीएनआरनं.एमएचएसआय०६-०००३३-२०२२</u>**

१. प्रस्तुत अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९, नियम १ व २ प्रमाणे दाखल करणेत आलेला असून, त्यायोगे वादीने दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत प्रतिवादी क्र. १ यांनी वादी यांच्या घराकडे जाणाऱ्या वाटेवर वाढीव बांधकाम करु नये असा तूर्तातूर्त मनाई आदेश पारीत होणेबाबत विनंती केलेली आहे.

२. वादीच्या अर्जातील थोडक्यात कथन पुढीलप्रमाणेः-

मौजे मळेवाड ता.सावंतवाडी,जि.सिंधुदुर्ग येथील सर्वे नं. ४४ हिस्सा नं. १ क्षेत्र ६ हे.४६ आर पो.ख.२ हे.१५ आर आकार १रु. ५२ पै. या मिळकतीमध्ये असलेला मळेवाड कोंडुरा ग्रामपंचायत इमला क्र. ५६२ अ, ब , क, व ड हा इमला या अर्जाचा विषय आहे. सर्वे नं. ४४ हिस्सा नं. १अ ही मिळकत वादी व प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार साबाजी गणू गावडे यांचे कुळपणाची होती. या मिळकतीमध्ये साबाजी गावडे यांनी त्यांचे हयातीत इमला क्र.५६२ हा इमला बांधलेला होता. साबाजी गावडे यांचे दि. २८/०२/२०२० रोजी निधन झालेनंतर या मिळकतींना वादी व प्रतिवादी यांच्या नावाची नोंद झालेली आहे. इमला क्र. ५६२ या मिळकतीचे अ,ब,क व ड असे इमले झालेले असून इमला क्र. ५६२ अ ही मिळकत प्रतिवादी क्र. ३ व ७ यांचे कब्जेभोग्यास आहे. त्याचप्रमाणे इमला क्र. ५६२ ब ही मिळकत प्रतिवादी क्र. १ व ६ यांचे कब्जेभोग्यास आहे. इमला क्र. ५६२ क ही मिळकत वादी यांचे कब्जेभोगयास व इमला क्र. ५६२ ड ही मिळकत प्रतिवादी क्र. ४ब यांचे कब्जेभोग्यास असून त्याप्रमाणे ग्रामपंचायत असेंसमेंट सदरी नोंद झालेली आहे.

वादी पुढे असे कथन करतात की, इमला क्र. ५६२ हा पूर्वाभिमुखी असून या इमल्याच्या दक्षिण दिशेला लागून पश्चिमेकडे जाणारे वादी व प्रतिवादी यांचे वापरातील ६ फुट

रुंदीची पायवाट आहे. सदर पायवाट ही वादी यांच्या कोंडुरे ग्रामपंचायत घर क्र. १०९१ या मिळकतीकडे जाते. प्रतिवादी क्र. १ यांनी घर क्र. ५६२ ची दुरुस्ती करणेबाबत ग्रामपंचायत कोंडुरे यांचेकडे परवानगी मागितलेली होती. परंतु, प्रतिवादींनी घर क्र. ५६२ ची भिंत पाडून वादी व प्रतिवादी यांच्या जाण्यायेण्याची वाट अडवून त्याठिकाणी नवीन बांधकाम करणेस खड्डे खणून आरसीसी बांधकाम करणेस सुरुवात केली याबाबत वादीने ग्रामपंचायतीकडे तक्रार देवून देखील प्रतिवादी क्र. १ हा घराचे वाढीव बांधकाम करणेच्या प्रयत्नात आहे असे झालेस वादी यांना त्यांच्या मिळकतीकडे जाणेसाठी असणारी पायवाट बंद होवून त्यांचे अतोनात नुकसान होणार आहे. यास्तव वादीने सदरचा दावा दाखल करुन सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रस्तुतकामी प्रतिवादीस सदर दाव्याची समन्स व अर्जाची बजावणी होवून देखील ते याकामी हजर झालेले नसलेमुळे सदरचा दावा त्यांचेविरुध्द एकतर्फा चौकशी करणेबाबत आदेश पारीत झालेला आहे.

४. प्रस्तुत कामी वादीतर्फे विधिज्ञ श्री.एस.ए.राणे यांचा युक्तीवाद ऐकला.

५. वादीची कथने विचारात घेता, माझ्या समोर पुढील प्रमाणे मुद्दे उपस्थित होत आहेत. त्यांचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसहित पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीला प्रथमदर्शनी संयुक्तिक बाजु असल्याची बाब सिध्द झालेली आहे का ? | होकारार्थी |
| २. | न्यायाचा समतोल वादीचे बाजुने आहे का ? | होकारार्थी |
| ३. | सदरचा अर्ज नामंजुर झालेस वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे का ? | होकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र.१ ते ३ करीता –**

**६.** प्रस्तुत कामी प्रतिवादींविरुध्द तूर्तातुर्त मनाई आदेश पारीत होणेकरीता वादीने त्यास दावेची संयुक्तिक बाजू आहे ही बाब न्यायालयाच्या निर्दशनास आणून देणे जरुरीचे आहे. प्रस्तुतकामी वादीच्या मते, सर्वे नं. ४४ हिस्सा नं. १ व दावा इमला क्र. ५६२ या मिळकती वादी व प्रतिवादी यांना त्यांचे पूर्वहक्कदार साबाजी गावडे यांचे मृत्यू पश्चात मिळालेली असून, साबाजी गावडे यांचे पश्चात या मिळकतीमध्ये त्यांची कुळपणाची वहिवाट आहे. प्रस्तुतकामी वादीने निशाणी क्र. ६ लगत सर्वे नं. ४४ हिस्सा नं. १ या मिळकतीचा सातबरा उतारा हजर केला असून, त्याचे अवलोकन केले असता, या मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांचे नाव कुळ म्हणून नोंद असल्याचे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे वादीने निशाणी क्र. ७ ते १० लगत हजर केलेले असेसमेंट उतारे यांचे वाचन केले असता, इमला क्र. ५६२ अ,ब,क,व ड या मिळकतीस वादी कथन करतात त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी यांचे स्वतंत्र नावाची नोंद झालेली दिसून येत आहे.

**७.** प्रस्तुतकामी प्रतिवादी क्र. १ यास संधी देवून देखील तो याकामी हजर झालेला नाही. तसेच त्याने वादीची कथने नाकारलेली नाहीत. वादीने दावा मिळकतीच्या कब्जेभोग्याबाबत अर्जामध्ये नमूद केलेल्या कथनास अभिलेखावर हजर करणेत आलेले उतारे पुष्टी देत आहेत. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र. १ याने इमला क्र. ५६२ या मिळकतीच्या दक्षिण बाजूस असणाऱ्या पश्चिमेकडे जाणाऱ्या पायवाटेमध्ये बांधकाम करणेस सुरुवात केली म्हणून वादी यांनी ग्रामपंचायत कोंडुरे यांचेकडे हरकत घेतली या वादीच्या कथनास निशाणी क्र.३/७ ते ३/९ लगत हजर केलेल्या कागदपत्रांतील मजकूर दुजोरा देत आहे. त्याचप्रमाणे निशाणी क्र. ३/९ लगत वादीने हजर केलेले ग्रामपंचायत मळेवाड यांनी वादीस दिलेल्या पत्रातील मजकूर विचारात घेता, प्रतिवादी क्र.१ हा बेकायदेशीररित्या बांधकाम करीत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. वादीने निशाणी ४/९

लगत व निशाणी २४/२ लगत हजर केलेले फोटो विचारात घेता,प्रतिवादी क्र. १ हा पूर्वीच्या इमल्यास लागून नवीन बांधकाम करीत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. तसेच निशाणी क्र. ४/९ लगत हजर केलेल्या फोटोवरुन प्रतिवादी क्र. १ हा बांधकाम करीत असलेल्या ठिकाणी येणे जाणेस पायवाट असल्याचे देखील प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

८. वादीने सदर मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची समाईक कब्जाभोग्याची मिळकत आहे असे कथन केलेले आहे. वादीने या मिळकतीच्या मालकी हक्काबाबत कोणतेही कथन केलेले नाही. तसेच अभिलेखावर हजर करणेत आलेला पुरावा हा या मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांची कब्जे वहिवाट आहे हे स्पष्ट करीत आहे. काही क्षणांकरीता वादी व प्रतिवादी हे या मिळकतीचे सहहिस्सेदार आहे असे जरी गृहित धरले तरीदेखील प्रतिवादी क्र. १ यास अन्य सहहिस्सेदारांचे संमत्तीखेरीज त्यास हव्या असलेल्या क्षेत्रात बांधकाम करणेचा हक्क प्राप्त होवू शकत नाही व सदर दाव्याचे कामी वादी हे प्रतिवादी क्र. १ यांनी पायवाटेत बांधकाम करु नये इतकाच तूर्तातूर्त मनाई आदेश होणेबाबत विनंती करीत आहेत.

९. वरील सर्व कारणमिमांसा विचारात घेता, वादीस दाव्याची संयुक्तिक बाजू असल्याचे दिसून येत आहे. तसेच सदरकामी तूर्तातूर्त मनाई आदेश न पारीत झालेस प्रतिवादी क्र. १ हा वादी कथन करतात त्याप्रमाणे पायवाटेमध्ये बांधकाम करुन पायवाट बंद करण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे झालेस, वादीचेच अपरिमित नुकसान होणार आहे. प्रतिवादी क्र. १ विरुध्द तूर्तातूर्त मनाई आदेश पारीत झालेस त्याचे कोणतेही नुकसान होत असल्याचे दिसून येत नाही. सबब, न्यायाचा समतोल व अपरिमित नुकसान याबाबी वादीच्या बाजूने असल्याचे दिसून येत आहे. सबब मी मुद्दे क्र. १ ते ३ चा निष्कर्ष 'होकारार्थी' नोंदविते.

**<u>मुद्दा क्र.४ करीता –</u>**

**१०.** मुद्दा क्र.४ करीता मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–::– आदेश –::–**

**१.** अर्ज मंजूर करणेत येतो.

**२.** दाव्याच्या अंतिम निर्णयापर्यंत प्रतिवादी क्र. १ यांनी दावा इमला क्र. ५६२ या मिळकतीच्या दक्षिण बाजूस असणाऱ्या ६ फुट रुंदीच्या घराकडे येणे जाणे करीता असलेल्या पायवाटेमध्ये कोणत्याही प्रकारचे वाढीव बांधकाम करु नये असा तूर्तातूर्त मनाई आदेश पारीत करणेत येत आहे.

**३.** खर्चाबाबत आदेश नाही.

DURGA BHAGAWAN SUTAR

Digitally signed by DURGA BHAGAWAN SUTAR
Date: 2023.04.11 11:26:24 +0530

( डी. बी. सुतार)

दिनांकः– ०५/०४/२०२३.

सहदिवाणी न्यायाधीश (क.स्तर), सावंतवाडी.